ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार, ७ एप्रिल, १९६५ | अंक ७

## विविध माहिती

**नेपाळची गिर्यारोहणाला बंदी**—नेपाळच्या सरकारनें गौरीशंकर शिखर सोडून इतर शिखरांवर चढण्यास बंदी करणारा हुकूम काढला आहे. ह्या बंदीमुळें जपानमधील गिर्यारोहकांत खळबळ उडाली आहे. जपानमध्यें गिर्यारोहणाविषयीं आस्था असणारे अनेक क्लब आहेत. गेल्या दहा वर्षांत गिरिशिखरें पादाक्रांत करण्यासाठीं ज्या परदेशीय मोहिमा झाल्या, त्यांत जपानचा पहिला अनुक्रम आहे. ह्या बहुतेक मोहिमा जपानी विद्यापीठांनीं अगर संशोधन संस्थानीं शास्त्रीय संशोधनासाठी पाठविलेल्या होत्या.

**महाराष्ट्रांतील अपंगांची संख्या**—महाराष्ट्रांतील अपंगांची संख्या सुमारें ८१ हजार आहे असें नुकत्याच करण्यांत आलेल्या पाहणीवरून दिसून आलें आहे. त्यांपैकी ७३ हजार लोक ग्रामीण भागांतील आहेत. अपंगांत २८ हजार अंधळे, १० हजार बहिरे, १२ हजार लंगडे, २० हजार अपंग कुष्ठरोगी आणि ४,७०० थोटे अगर हातानें अधू आहेत. अपंगांच्या संख्येच्या मानानें त्यांच्या हितासाठी काम करणाऱ्या संस्था मात्र अल्प आहेत. सरकारी संस्थांची संख्या ८ असून खाजगी संस्था ३३ आहेत.

**रेल्वेसाठीं जमिनीची मिळवणी**—पुणें ते मिरज हा अरुंद रुळाचा रेल्वेमार्ग रुंद रुळाचा करण्यासाठी सांगली जिल्ह्यांत ३०० एकर जमीन ताब्यांत घेण्यांत येत आहे. ह्या कामासाठी १२ लाख रुपये खर्च येणार आहे. काम लवकर पूर्ण करण्यासाठी सातारा व पुणें जिल्ह्यांतील जमीनहि लागणार असल्यानें त्या जिल्ह्यांतील जमिनी ताब्यांत घेण्यासाठीं एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आलेली आहे. जमिनी ताब्यांत घेण्याचें काम त्यांना लवकरांत लवकर उरकावयाचें आहे.

**चीनमधील कम्युनिस्ट पक्षांत फूट**—चीनच्या कम्युनिस्ट पक्षांत फूट होऊन त्यांत जहाल व नेमस्त असे तट पडल्याच्या वार्ता आहेत. त्यांपैकी जहालांचें पुढारीपण पक्षाचे अध्यक्ष मि. माओ—त्से-टुंग ह्यांच्याकडे असून नेमस्त तटाचें पुढारीपण चौ—इन—लाय ह्यांच्याकडे आहे. पक्षांतर्गत घडामोडीवरून अशी चिन्हें दिसत आहेत कीं मि. माओ ह्यांना प्रकृतीमुळें राजकारणांतून बाहेर पडावें लागेल अगर त्यांना दुसरे कांहीं पक्ष—सभासद बाहेर घालवितील. मि. माओ ह्यांचें वय ७१ वर्षांचें असून अलीकडे त्यांची प्रकृति बेताचीच राहिलेली आहे.

**तेलकंपन्यांवर निर्बंध**—इंडोनेशिआच्या सरकारनें परकीय मालकीच्या सर्व तेलकंपन्यांच्या कारभारावर देखरेख आणि नियंत्रण करण्याचें ठरविलें आहे. ह्या तेलकंपन्यांपैकी बहुतेक तेलकंपन्या अमेरिकन भांडवलाच्या असून कांहीं डच भांडवलाच्या आहेत. नियंत्रणाचें स्वरूप अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं.

**कोळशापासून खत**—धनबाद येथील मध्यवर्ती जळण संशोधन केंद्रानें कोळशापासून खत तयार करण्याची नवी प्रक्रिया शोधून काढली आहे. बिहारमधील संथाळ परगण्यांतील भातशेतींत नव्या खतांच्या वापराचा प्रयोगहि करून पाहण्यांत आला आहे. प्रयोगाचें मूल्यमापन केल्यावर असें आढळून आलें कीं नव्या खतामुळें भाताच्या एकरीं पिकांत वाढ तर झालीच; पण शिवाय त्यामुळें जमिनीचीही प्रत खालावण्याचेंहि थांबेल. सेंद्रिय खतापेक्षा हें खत अधिक उपयुक्त असल्याचें दिसून आलें आहे.

**दाल सरोवरांत रेस्टॉरॉं आणि मद्यगृह**—काश्मीरमध्यें येणाऱ्या हौशी प्रवाशांची बडदास्त अधिक चांगल्या रीतीनें करतां यावी म्हणून काश्मीर सरकारनें नवे उपक्रम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. दाल सरोवरांत एक भव्य रेस्टॉरॉं आणि मद्यगृह उभारण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी १ लाख रुपये खर्च येईल. प्रवाशांना हिंडण्यासाठी अनुकूल हवा राखणाऱ्या तीन विलासी मोटारगाड्या तयार करण्यांत आल्या आहेत. अशाच प्रकारच्या आणखीहि कांहीं गाड्या तयार करण्याचें काम चालूं आहे. प्रवाशांच्या मार्गदर्शनाची सोयहि अधिक चांगली करण्यांत येत आहे.

**१९६३ मधील मच्छीमारी**—१९६३ सालीं भारतामधील मच्छीमारीच्या धंद्यानें १० लाख टन मासे पकडले. त्यांपैकीं ७ लाख टनांवर मासे ताजे म्हणून विकण्यात आले आणि बाकीचे उन्हांत सुकवून अगर खारवून विकण्यांत आले. १९६० सालींहि ह्या धंद्यानें १० लाख टनांपेक्षा अधिक मासे पकडण्यांत यश मिळविलें होतें.

**हिंदी संगीताची लोकप्रियता**—विख्यात सतारवादक श्री. रवि शंकर परदेशांचा दौरा संपवून भारतांत परत आले. कॅलिफोर्निआ येथील विद्यापीठांत सहा महिनेपर्यंत त्यांनीं हिंदी संगीत शिकविलें. ८० अमेरिकन विद्यार्थ्यांनीं जुन्या पद्धतीचें उत्तर हिंदुस्थानीं संगीत आत्मसात् करण्यांत चांगलें यश मिळविलें. हिंदी संगीतामधील आध्यात्मिक छटा अमेरिकन लोकांना जाणवूं लागली आहे.

**प्रेमाविव्हल वृद्धाचा आत्मघात**—८२ वर्षांच्या एका वृद्धानें स्वतःचा आत्मघात करून घेतल्याचा एक खटला लंडनमधील कोर्टांत चालला होता. आपल्या प्रियतमेवर प्रेम करण्यास लायक वयापेक्षा आपण म्हातारे होत चाललों अशा समजुतीनें त्यानें विष घेऊन मृत्यूला कवटाळलें होतें. ८२ वर्षांच्या वयांत सुद्धां प्रेमासारखा हृदयविकार इतका प्रबल व्हावा, ह्याबद्दल निकालपत्रांत कोर्टानें आश्चर्य व्यक्त केलें आहे.

### महाराष्ट्र बँकेचे पहिले मॅनेजर श्री. गोखले ह्यांचें निधन

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे पहिले मॅनेजर, श्री. म. मि. गोखले हे मुंबई येथें नुकतेच, दि. २२ मार्च रोजीं निवर्तले, हें कळविण्यास वाईट वाटतें. महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेनंतर त्यांची मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यांत आली; त्यापूर्वी ते बँक ऑफ कोल्हापूर लि. मध्यें अकौंटंट होते. १९३५ ते १९४२ त्यांनीं मॅनेजरचें काम केलें; त्यानंतर तीन वर्षें ते बँकेचे डायरेक्टर होते. त्यांच्या मृत्यूबद्दल दुखवटा व्यक्त करणारा ठराव महाराष्ट्र बँकेच्या संचालक मंडळानें करून त्यांच्या कुटुंबियांच्याकडे पाठविला आहे.

---

### दि सांगली बँक लि., सांगली

७,५६,७०० रु. वसूल भांडवल असलेल्या आणि ११,३७,७८० रु. रिझर्व्ह व इतर फंड असलेल्या ह्या बँकेनें १९६४ मध्यें उत्कृष्ट प्रगति केली आहे. ठेवींची रक्कम ३ कोटी, २० लक्ष रु. ची ४ कोटी, ३८ लक्ष रु. झाली आहे. दिलेलीं कर्जें २ कोटी, १७ लक्ष रु. चीं २ कोटी, ८२ लक्ष रु. झालीं आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस १,५०,०४२ रु. नफा झाला. १५% करपात्र डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. १९६४ मध्यें बँकेनें तळेगांव दाभाडे ( जि. पुणें ) आणि नाशिक येथें शाखा उघडल्या. चालू वर्षी वाई ( जि. सातारा ) आणि अहमदनगर येथें शाखा उघडल्या. म्हणजे, शाखांची एकूण संख्या ३५ झाली आहे. अहवालाचे वर्षी श्री. गुरुगोविंद स्पींशी बँक प्रा. लि., विजापूर, युनायटेड बँक ऑफ कर्नाटक लि, धारवाड आणि युनियन बँक ऑफ विजापूर अँड सोलापूर लि., विजापूर ( आणि तिच्या सहा शाखा ) ह्या तीन बँका सांगली बँकेंत विलीन झाल्या.

---

### यूनिट ट्रस्टच्या पैशांची गुंतवणूक

यूनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या व्यवहाराची ताजी ( १५ मार्च, १९६५ ची ) परिस्थिति खालीलप्रमाणें आहे.

यूनिट ट्रस्टकडे १९ कोटी रु. च्या यूनिट्ससाठी १,३३,००० अर्जे आहेत. ह्याच मुदतींत ट्रस्टनें १४ लक्ष रु. किंमतीच्या यूनिट्सची फेरखरेदी केली. ट्रस्टजवळील २४·४ कोटी रु. च्या रकमेपैकीं ३·८५ कोटी रु. (१५·८%) सरकारी व निमसरकारी रोख्यांत, ८·६७ कोटी रु. ( ३५·५% ) ऑर्डिनरी भागांत, १·७६ कोटी रु. ( ७·२% ) प्रेफरन्स भागांत आणि ७·९८ कोटी रु. ( ३२·७% ) डिबेंचर्समध्यें गुंतविण्यांत आले आहेत आणि २० लक्ष रु. ( ०·८% ) रोखींत आहेत.

---

**भारतामधील राज्यासंबंधीं लिखाण**—भारतीय संघराज्यांतील निरनिराळ्या राज्यासंबंधीं ऐतिहासिक व आर्थिक माहितीचे निबंध उझबेकिस्थानच्या मध्यवर्ती शास्त्रीय संघटनेनें प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. हे निबंध एकूण १६ खंडांत मिळून प्रसिद्ध होतील. त्यांपैकीं दोन मोठमोठ्या निबंधांत १६ ते १८ व्या शतकांतील भारताच्या व मध्य आशिआच्या संबंधांचे असतील. ते तयार करण्याच्या कामीं कांहीं अज्ञात साधनांचा उपयोग करण्यांत येईल.

**इन्कमटॅक्स देणारांची संख्या वाढली**—प्राप्तिकराची आकारणी करण्यांत आलेल्यांची संख्या आतां २० लक्ष झाली आहे; कांहीं वर्षांपूर्वी ती फक्त १३ लक्ष होती.

*ज्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ रणजी करंडक सामने खेळले जातात, त्या क्रिकेट सम्राटाचे चरित्र*

अलौकिक क्रिकेटपटु

# र ण जी

: लेखक :
वसंत रायजी

: अनुवादक :
श्री. वा. काळे

*" श्रीयुत श्री. वा. काळे ह्यांचा साहित्यिक म्हणून जेवढा मोठा लौकिक आहे, तितकाच खेळाडू म्हणूनहि आहे. त्याला साजेसाच हा अनुवाद उतरला आहे. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे, त्याचप्रमाणें चरित्रनायकाचें वैशिष्टपूर्ण दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या मार्मिकतेचें मला कौतुक वाटतें. "*

—विजय मर्चंट

रविवार दि. ११ एप्रिल रोजीं प्रसिद्ध होणार !

*इकडे लक्ष द्या :*

## ठेवींवरील व्याजाचे दर वाढले !

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| ९१ दिवस | ५¼% ( सव्वापाच ) |
| ६ महिने | ५½% ( साडेपाच ) |
| ९ ते ११ महिने | ५¾% ( पावणेसहा ) |
| १ वर्ष | ६¼% ( सव्वासहा ) |
| २ वर्षें | ६½% ( साडेसहा ) |
| ३ आणि ४ वर्षें | ७ % ( सात ) |
| ५ आणि ६ वर्षें | ७½% ( साडेसात ) |
| सेव्हिंग बँक खात्यावर | ४ % ( चार ) |

*अधिक बचत करा आणि बचतीवर अधिक व्याज मिळवा*

म्हैसूर, महाराष्ट्र आणि गोवा येथील ३८ शाखांपैकी कोणत्याहि शाखेंत चौकशी करा

## बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )
रजिस्टर्ड ऑफिस : बेळगांव.

# अर्थ

बुधवार, ७ एप्रिल, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआला परदेशीय हुंडणावळीची टंचाई

सोव्हिएट रशिआला परदेशीय हुंडणावळीच्या चणचणीमुळें विकट परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. हुंडणावळीच्या टंचाई-मुळें परदेशांतून आयात करावयाच्या मालाची व यंत्रसामग्रीची आवक जवळजवळ बंद झाली आहे, अशा वार्ता आल्या आहेत. १९६३ व १९६४ सालीं रशिआंत अन्नधान्याचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर पडला. त्यामुळें सोनें आणि दुर्लभ चलनाचा मोबदला देऊन अन्नाची फार मोठी आयात करावी लागली आणि हुंडणा-वळीचा तुटवडा निर्माण झाला. अजूनहि रशिआ अन्नधान्याची आयात करीत आहे. पण त्याचें प्रमाण १९६४ च्या ऑक्टोबर-पासून कमी झालें आहे. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या मतानें रशिआ-जवळील सुवर्णाचा सांठा सुमारें २०० कोटी डॉलर्सचा असावा. हा अंदाज कितपत बरोबर आहे तें सांगतां येण्यासारखें नाहीं. कारण, रशिआ सोन्याचा सांठा अगर त्याचें वार्षिक उत्पादन ह्यांचे आंकडे जाहीर करीत नाहीं. गेल्या महिन्याच्या आरंभीं रशिआनें जपानला २० कोटी डॉलर्स किंमतीचें सोनें विकण्याची तयारी दाखविली, तेव्हां पश्चिम युरोपांतील तज्ज्ञांचें त्याकडे साह-जिकच लक्ष वेधलें गेलें. रशिआला पश्चिम युरोपांतून माल विकत घ्यावयाचा झाल्यास तो आपलें सोनें लंडनच्या बाजारांत विकून परदेशीय चलन मिळवतो, पण लंडनमधील बाजारांत सोनें विकूं लागल्यास त्याचा बभ्रा होतो. म्हणून रशिआनें जपानमध्यें मुका-ट्यानें सोनें विकण्याचा प्रयत्न केला, असें म्हणतात. गेल्या सहा महिन्यांत रशिआनें ७० कोटी डॉलर्स मालाच्या आयातीसाठी दिलेले आहेत. रशिआ परदेशाला माल निर्यात करून दरसाल जवळजवळ १०० कोटी डॉलर्स कमावतो, परंतु गेल्या सहा महिन्यांत त्याला परदेशीय हुंडणावळीच्या वार्षिक प्राप्तीपैकी सुमारें दोन तृतीयांश प्राप्ती खर्चून टाकावी लागली आहे.

---

## लंडनमधील काळ्या आदमींची कुचंबणा

कामधंद्यासाठी ब्रिटनला जाऊन स्थायिक होऊं पाहणाऱ्या काळ्या आदमींची राहण्याच्या जागेबाबत मोठी कुचंबणा होत आहे. ह्यांपैकीं बहुतेक लोक भारत, पाकिस्तान आणि वेस्ट इंडीज-मधून आलेले असतात आणि त्यांमधील जवळजवळ निम्मे लंडनमध्यें केंद्रित झालेले आहेत. राहण्याची जागा विकत अगर भाड्यानें घेण्याचे त्यांचे प्रयत्न फारसे सफल होत नाहींत. एक तर त्यांना जागा देण्याच्या बाबतींत प्रच्छन्न विरोधच करण्यांत येतो. जागा मिळालीच तर जागेचे मालक त्यांच्या अडचणींचा गैरफायदा उठवतात. त्यांना जुन्या व अपुरी दुरुस्ती केलेल्या जागा जबर भाड्यानें घ्याव्या लागतात. त्यांत पुनः राहत्या जागेंत किती माणसें असावीं ह्यालाहि धरबंद राहिलेला नाहीं. राहत्या जागेच्या टंचाईचा परदेशांतून आलेल्या काळ्या लोकांवर काय परिणाम झाला आहे तें पाहण्यासाठी एक स्वतंत्र कमिटी नेमण्यांत आली होती. तिनें १८ महिने परिस्थितीचा अभ्यास करून ४५० पानांचा अहवाल तयार केला आहे. लंडनमधील जागेच्या ह्या टंचाईचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागतो. पण, काळ्या आदमींना टंचाईची खरी धार जाणवते. राहती जागा केव्हां सोडावी लागेल त्याचा नेम सांगवत नाहीं. कांहीं वेळां तर जागेच्या मालकांकडून जागा सोडण्यासाठी खुनाच्या धमक्याहि देण्यांत येतात. कांहीं मालक अन्य तऱ्हांनीं बिऱ्हाडकरूला सता-वतात. बिऱ्हाडकरूच्या जागेंत मेलेला उंदीर मुद्दाम टाकणें, त्याच्या स्नानगृहांत साप सोडणे, किंवा त्याच्या बिछान्यावर खाज सुटणारी पावडर टाकणे इत्यादि उपाय योजण्यांत येतात. ब्रिटनमध्यें परदेशांतून आलेल्या ह्या कायमच्या पाहुण्यांपैकीं ४७ टक्के लोक लंडनमध्यें राहतात. लंडनच्या एकूण लोकसंख्येशीं त्यांचें प्रमाण अवघें ४ टक्के पडतें. पण राहत्या जागेच्या टंचाईचा वनवास त्यांना विशेष भोंवतो.

---

## अधिक वेगानें धावणाऱ्या रेल्वेगाड्या

रेल्वेचा प्रवास अधिक सुखकारक करण्यासाठी रेल्वे खात्याचे प्रयत्न कमीअधिक प्रमाणांत चालू असतात. त्यांतहि लांबच्या प्रवाशांच्या सोईकडे अधिक लक्ष देण्यांत येतें आणि तें रास्तहि आहे. परंतु दूरच्या प्रवासांतील कांहीं अडचणींचें निवारण करणें अवघड असतें. तेव्हां दूरचे प्रवास कमींत कमी वेळांत उरकण्याचें साधलें तर तें ह्या अडचणींचें निराकरण करण्याच्या कामीं उपयुक्त ठरेल. भारतीय रेल्वे खात्यानें प्रवासी गाड्यांचा वेग वाढविण्याची शक्यता अजमावण्यासाठीं एक स्वतंत्र विभागच काढला आहे. लांब पल्ल्याच्या प्रवासांत गाड्यांना जास्त वेग कसा देतां येईल ह्याची तपासणी हा विभाग करणार आहे. त्यासाठी दिल्ली–आग्रा मार्गांतील रेल्वेमार्गाची निवड करण्यांत आलेली आहे. भारता-मधील प्रवासी वाहतूक करणाऱ्या रेल्वेगाड्यांचा वेग इतर देशां-तील प्रवासी गाड्यांच्या मानानें बराच कमी आहे. रेल्वेमार्गाची भारतामधील लांबी जगांत तिसऱ्या क्रमांकाची आहे ही गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. रुंद रुळावर चालणाऱ्या प्रवासी गाड्यांचा भारतामधील कमाल वेग दर तासाला ६० मैल आहे आणि अरुंद रुळांवर चालणाऱ्या गाड्यांचा वेग ४५ मैल आहे. रेल्वे मार्गाच्या हमरस्त्यांवरून तरी ही गति दर तासाला १०० मैल करतां येईल काय, ह्याचा विचार रेल्वेखातें करीत आहे. फ्रान्समध्यें प्रवासी गाड्यांचा जास्तींत जास्त वेग दरताशीं ९० मैल आहे आणि अमेरिकेंतील गाड्यांचा वेग १०० मैल आहे. अर्थात् एंजिनांची शक्ति एवढेंच कांहीं वेग वाढविण्याचें साधन नाहीं. रेल्वेमार्गाचा पक्के-पणा, वाहतूक सोसण्याची त्याची पात्रता, वाटेंतील स्टेशनांवर थांबण्यांत जाणारा वेळ, मार्गावरील चढउतार व वळणें, इत्यादि अनेक गोष्टींवर गाड्यांचा वेग अवलंबून असतो. भारतामधील रेल्वे मार्गांवर गेल्या कांहीं वर्षांत झालेले अपघात लक्षांत घेतां रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचाहि ह्या संदर्भात विचार झाला पाहिजे.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा

बँकेच्या भागधारकांच्या २८ व्या, शनिवार दि. २७-३-६५ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील, बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, श्री. रा. ना. गोडबोले, यांचें भाषण—

सन १९६४ मध्यें आपल्या बँकेनें मार्गात आलेल्या विविध अडचणींतून मार्ग काढून सर्वांगीण व सर्वकष प्रगति साधलेली आहे हें आपणांस सांगण्यास मला आनंद होत आहे. सर्वच बाबतींत बँकेनें प्रगतीचा आणखी एक टप्पा गांठला आहे.

बँकेच्या वसूल भांडवलांत रु. २३,०२५ ची भर पडली आहे. ही भर अर्थातच भागांवरील येणे असलेले हप्ते जमा झाल्यामुळें पडली आहे. बँकेच्या ठेवी रु. ३९२.९० लाखावरून वाढून त्या रु. ४२५.०५ लाख झालेल्या आहेत. ठेवींमधील झालेली वाढ समाधानकारक वाटते. बँकेची रोखे, शेअर्स वगैरे मधील एकूण गुंतवणूक रु. १५९.२० लाखावरून वाढून ती रु. १७०. ११ लाख इतकी झालेली आहे. तसेंच कर्जव्यवहार रु. १७४.७८ लाखावरून वाढून रु. २०९.६६ लाख झालेला आहे. म्हणजेच ठेवींमध्यें झालेल्या वाढीच्या प्रमाणांत गुंतवणूक व कर्जव्यवहार यांतहि समतोलपणें वाढ झालेली आहे. बँकेची आर्थिक स्थिति मजबूत करण्याचे दृष्टीनें बँकेच्या आजपर्यंतच्या धोरणास अनुसरून याहि वर्षी नफ्यांतून जितकी जास्तीत जास्त रक्कम गंगाजळींत टाकतां येईल तितकी टाकण्याची संचालक मंडळानें शिफारस केलेली आहे.

### खर्च वाढूनहि नफ्यांत वाढ

इन्कम्‌टॅक्स व इतर आवश्यक तरतुदी केल्यावर राहणारा निव्वळ नफाहि रु. ३२,४३८ नी म्हणजेच जवळ जवळ १७ टक्क्यानें वाढला आहे. नफातोटापत्रकाकडे नजर टाकल्यास असें आढळून येईल कीं, व्याज, कमिशन, वगैरे मिळकतीच्या महत्त्वाच्या बाबींमध्यें खूपच प्रमाणांत वाढ झाली आहे. अर्थात् तशाच प्रमाणांत खर्चाच्या बाबींतहि वाढ झालेली आहे. बँकेच्या नोकरवर्गास दिलेल्या नवीन वेतनश्रेणी व इतर सवलती यांमुळें नोकरखर्चाचे प्रमाणांत बरीच वाढ झालेली आहे. तसेंच ठेवींवरील व्याजाच्या दरांतहि बँकेनें अहवाल सालीं वाढ केलेली असल्यामुळें त्याबाबतच्या खर्चांतहि बरीच वाढ झालेली आहे. वास्तविक खर्चाच्या वाढीची हीं दोन्हींहि कारणें नेहमीच्या स्वरुपाचीं नाहींत. कारण, वरील दोन्ही बाबींमध्यें नैसर्गिक वाढ फक्त नोकरांना मिळणारी वार्षिक पगारवाढ व ठेवी वाढल्यामुळें होणारी व्याजाचे खर्चात वाढ यामुळेंच होत असते. परंतु या कारणाव्यतिरिक्त इतर कारणांनीं वरील खर्चांमध्यें बऱ्याच प्रमाणांत वाढ झालेली असूनदेखील बँकेनें आपल्या नफ्यांत वाढ केलेली आहे ही गोष्ट समाधानाची आहे.

### बँकेची इमारत व शाखावाढीचा कार्यक्रम

बँकेनें अहवाल सालीं केलेल्या प्रगतीच्या संदर्भात मला आणखी दोन गोष्टी आपणांस सांगावयाच्या आहेत. त्यांपैकी एक अशी कीं, भागधारकांनीं व बँकेच्या इतर हितचिंतकांनीं वेळोवेळीं व्यक्त केलेल्या इच्छेनुसार बँकेनें स्वतःकरितां साताऱ्यांत एक जागा मध्यवर्ती ठिकाणी खरेदी केलेली आहे. तेथें बँकेच्या इमारतीचें काम योग्य वेळीं सुरू होऊन बँकेला साताऱ्यांत स्वतःची वास्तु लाभेल. दुसरी गोष्ट अशी कीं बँकेनें अहवाल सालीं एक नवीन शाखा कल्याण येथें सुरू केलेली आहे. नवीन शाखा उघडण्याचा बँकेचा हा उपक्रम पुढें चालू ठेवण्यात आलेला असून, फेब्रुवारी, १९६५ मध्यें आणखी दोन शाखा नातेपुते (जि. सोलापूर) व अंबरनाथ (जि. ठाणें) येथें उघडण्यांत आलेल्या आहेत. बँकेनें शाखावाढीचा हा जो कार्यक्रम हातीं घेतलेला आहे त्यामुळें बँकेची प्रगति अधिकाधिक साधली जाईल यांविषयीं मला शंका नाहीं.

अधिकारी वर्ग धरून सर्व नोकर वर्गाला नवीन वेतनश्रेणी व वैद्यकीय मदत वगैरे नवीन सवलती दिल्यामुळें बँकेच्या खर्चांत बरीच वाढ झाली आहे. त्यांतच रिझर्व्ह बँकेनें घातलेल्या निरनिराळ्या बंधनांची भर पडली आहे. कॉल डिपॉझिट्स् स्वीकारण्यास शेड्यूल्ड बँकांना केलेली बंदी व अल्प मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचे रिझर्व्ह बँकेनें ठरवून दिलेले दर यांमुळें बँकेच्या ठेवींवर परिणाम झाला. तसेंच कर्जव्यवहारावर रिझर्व्ह बँकेनें निरनिराळ्या प्रकारचीं बंधनें सर्व शेड्यूल्ड बँकांवर घातल्यामुळें आपल्या बँकेच्या कर्जव्यवहारावरहि त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. समाधानाची गोष्ट ही की, या आणि अशा प्रकारच्या इतर अडचणी सोसून देखील बँक प्रगति करू शकली.

### शेड्यूल्ड बँकांवरील बंधनांत तारतम्य हवें

यूनिट ट्रस्टची स्थापना ही बँकेच्या ठेवींच्या दृष्टीनें महत्त्वाची घटना आहे. तसेंच बाजारांतील किंमतींत आणि वापरांतील चलनांत झालेली वाढ आणि करआकारणीमध्यें सरकारनें केलेले निरनिराळे बदल यांचाहि आपल्या बँकेवर परिणाम झाला आहे. या बाबतींतील एक समाधानाची गोष्ट अशी की, सरकारला सध्यां गुंतवणुकींबाबतच्या अडचणींची जाणीव झालेली आहे आणि त्या दृष्टीनें केंद्र सरकार कांहीं विशिष्ट पावलें टाकीत आहे. मला येथें या बाबतींत एवढेंच म्हणावयाचें आहे की, सरकारनें या बाबतींत अधिक सावधगिरीनें पावलें टाकावींत आणि सध्यां शेअर बाजार आणि गुंतवणुकीचे वातावरणांत जी एक प्रकारची निराशेची भावना निर्माण झालेली आहे तिची योग्य ती दखल घ्यावी. विशेषतः रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांवर जी निरनिराळ्या प्रकारची बंधनें घालते तीं घालण्याअगोदर सर्व बाजूंनीं व्यावहारिक दृष्टिकोन ठेऊन काळजीपूर्वक विचार केला जावा. याबाबत आपल्या बँकेसारख्या लहान बँकांवर जे परिणाम होतात त्याकडे योग्य तें लक्ष दिलें जात नाहीं असा जो एक समज निर्माण झालेला आहे, त्याची योग्य ती दखल रिझर्व्ह बँकेनें घ्यावी. असें मी नम्रपणें सुचवूं इच्छितों. मोठ्या बँकांच्या जवळ अशा परिस्थितीला तोंड देण्याचीं जीं साधनें उपलब्ध असतात त्यांचा लहान बँकांकडे अभाव असतो. विशेषतः नवीन शाखा उघडण्याबाबतचीं बंधनें, ठेवींवरील व्याजाचे दर व कर्जव्यवहारावरची बंधनें आपल्यासारख्या लहान बँकांना जास्त जाचक ठरतात. आणि म्हणूनच सर्वच शेड्यूल्ड बँकांना एकाच मापानें न मोजतां रिझर्व्ह बँकेनें लहान शेड्यूल्ड बँकांच्या मर्यादित खेळत्या भांडवलाकडे पाहून त्यांना शेपतीळ अशींच बंधनें घालावींत. माझें केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक यांना असें आग्रहाचें सांगणें आहे की, ज्या शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी रुपये दहा कोटींहून कमी आहेत अशा बँकांना रिझर्व्ह बँकेचीं वरील प्रकारचीं बंधनें लागू केलीं जाऊं नयेत.

सातारा स्वदेशी कमर्शियल बँकेच्या भागधारकांना अहवाल सालीं त्यांचे शेअर्सवरील ऊर्वरित रक्कम पूर्णतः परत करण्यात आलेली आहे. सदरहू बँकेच्या कलेक्शन खात्यांतील येणे रकमांच्या वसुलीबाबत बँक पूर्ण दक्ष असून आज त्या खात्यात रु. ३२,०३४ इतकी शिल्लक आहे. ती व यापुढें त्यांत जी वेळोवेळीं भर पडेल ती सर्व रक्कम वरील बँकेच्या भागधारकांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीनें तत्परतेनें वाटली जाईल.

## शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाचा दुरुपयोग

म्हैसूर राज्यांतील एका कॉलेजामधील नियोजनविषयक संघटनेनें, शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाचा उपयोग कसा केला जातो ह्यासंबंधीं पाहणी केली आहे. शेतीच्या व्यवसायांत गुंतलेले लोक सहकारी संस्था, खाजगी सावकार अगर इतर लोक ह्यांच्यामार्फत कर्जें घेतात. पण त्यांच्यापैकी ९० टक्के लोक हीं कर्जें शेतीच्या कामासाठी उपयोगांत न आणतां दुसऱ्याच कोठल्या तरी कामासाठी वापरतात असें ह्या पाहणींत आढळून आलें आहे. फक्त १० टक्के लोकच जमिनींचा मगदूर वाढविण्यासाठीं, विहिरी खोदण्यासाठी, सुधारलेलें बीबियाणें घेण्यासाठी अगर खतासाठी, घेतलेल्या कर्जाचा उपयोग करतात. बाकीचे बहुसंख्य शेतकरी बारावे आणि बारसें साजरे करण्यासाठी पैशाचा दुरुपयोग करतात. कर्ज घेणाऱ्यांपैकी ६० टक्के लोक ती खाजगी सावकारांकडून घेतात व त्यासाठी शेकडा ७५ टक्केहि व्याज देतात. ह्याचें कारण सहकारी संस्थांकडून कर्जें मिळण्याबाबत होणारी दिरंगाई.

## मंत्र्याला २५ लाखांची लांच देण्याची तयारी

पंजाबचे शिक्षणमंत्री श्री. प्रबोधचंद्र ह्यांच्याकडे अबकारी खात्याचाहि कारभार सोपविण्यांत आला आहे. अबकारी खात्यातर्फे दारूचे गुत्ते चालविण्याचे परवाने देण्यांत येतात. त्यांनीं अबकारी खात्याचीं सूत्रें हातीं घेतल्यावर पंजाबमधील एक बडा कंत्राटदार त्यांच्याकडे आला व त्यांच्याकडे असलेल्या दारूच्या दुकानांचे परवाने रद्द न करण्याबद्दल त्यानें श्री. प्रबोधचंद्र ह्यांना २५ लक्ष रुपयांची लाच देऊं केली. श्री. प्रबोधचंद्र ह्यांनीं स्वतःच ही माहिती एका प्रसंगीं सांगितली. दास कमिशननें ज्यांच्यावर ठपका ठेवला आहे असे लोक पंजाबच्या राजकारणाच्या पटावर अजूनहि धुमाकूळ घालत आहेत ह्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

## गलथान राज्यकारभाराचा अजब नमुना

गुजरात राज्याच्या १९६३–६४ च्या ऑडिट रिपोर्टांत प्रथित करण्यांत आलेला राज्यकारभारांतील एक गैरप्रकार असा आहे. भावनगर येथील एका सरकारी इमारतीवर पहारा करण्यासाठी पूर्वीच्या भावनगरच्या संस्थानिकांनीं एक शिपाई नेमला होता. संस्थानचें विलीनीकरण झाल्यावर शिपायाची नेमणूक तशीच पुढें चालू ठेवण्यांत आली. पुढें ही इमारत मोडकळीस आली, जमीन उखणली गेली आणि छप्पर नाहींसें झालें, तरीसुद्धां शिपाई इमारतीवर पहारा करीतच राहिला. त्याच्या पगारासाठी व भत्त्यासाठी गेल्या १५ वर्षांत १० हजार रुपये खर्चीं पडलेले आहेत. ह्या इमारतीची किंमत ८,७०० रुपये धरण्यांत आली होती आणि तरीसुद्धां गेल्या डिसेंबरपर्यंत गुजरात सरकार ही इमारत पाडून जागा मोकळी करण्याच्या प्रश्नाचा विचारच करीत होतें.

## चित्रपटाचे मोफत खेळ

गेल्या महिन्याच्या ३० तारखेला फ्रान्समधील चित्रपटगृहांत प्रेक्षकांना मोफत चित्रपट दाखविण्यांत आले. फ्रान्समधील चित्रपट व्यावसायिकांचे मतानें तेथें ह्या धंद्यावर अतिशय जबर कर बसविण्यांत आलेले आहेत. ह्या करांविरुद्ध प्रचार करण्यासाठीं ३० तारखेला ५० हजार प्रेक्षकांना अनेक चित्रपटगृहांतून मोफत खेळ दाखविण्यांत आले. प्रेक्षक तिकिट घेऊन चित्रपट पाहात नसल्यानें तिकिटावरील कर देण्याचा प्रश्नच उद्भवला नाहीं. फ्रान्समधील सिनेमांच्या तिकिटांवर राष्ट्रीय व स्थानिक कर मिळून २४ टक्के कर द्यावा लागतो. हा कर अयोग्य असून इतर देशांतील करांच्या मानानें तो खूपच अधिक आहे असें ह्या धंद्यांतील लोकांचें म्हणणें आहे.

## दूरदर्शन प्रक्षेपणासाठी जर्मनीची मदत

नवी दिल्ली येथें मनोरंजनाचे दूरदर्शित कार्यक्रम प्रक्षेपण करण्याचें एक केंद्र स्थापन करण्यासाठी पश्चिम जर्मन सरकारनें मदत देऊं केली असून भारत सरकारनें ती स्वीकारली आहे. ह्या प्रक्षेपण केंद्रासाठी १८ लाख रुपये किंमतीची यंत्रसामग्री व इतर साधनें लागणार आहेत. पश्चिम जर्मनीचें सरकार हें सर्व साहित्य देणगी म्हणून देणार असल्यानें परदेशीय चलनाचा प्रश्न आपोआपच सुटला आहे. केंद्राच्या उभारणीसाठी उभयता सरकारांत विचारविनिमयहि चालू झाला आहे. उभारणीच्या तपशिलाची चर्चा करण्यासाठी जर्मन तंत्रज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. केंद्र चालविण्यासाठी हिंदी तंत्रज्ञांना जर्मनींत शिक्षण देण्याची व्यवस्था होणार आहे. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास ह्या ठिकाणी दूरदर्शन प्रक्षेपण केंद्रें उभारण्याची तयारी इतर कांहीं परदेशीय कंपन्यांनीं दाखविली आहे.

## बैल गेला आणि झोपा केला

डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा लोकसभेंत निवडून आलेला एक सभासद आहे. भारत संरक्षण कायद्याखालीं त्याच्यावर हुकूम काढण्यांत आला असल्यामुळें तो भूमिगत झालेला आहे. परंतु तरीहि लोकसभेच्या सभासदाला मिळणारा पगार आणि भत्ते मिळविण्यासाठी तो नुकताच दिल्लीला गेला. त्यानें सरळ लोकसभेच्या कचेरींत पदार्पण केलें आणि आपला पगार व भत्ता ह्यांची रीतसर वसुली केली. त्यानंतर कांहीं दिवसांनीं तो दिल्ली सोडून गेल्यावर ही गोष्ट लक्षांत आली. लोकसभेचा हा सभासद केरळमधील आहे. तो केरळमधील आपल्या खेड्यांतून प्रथम मद्रासला आला व तेथून विमानानें दिल्लीला गेला. भूमिगत राजकीय कार्यकर्त्यांची गुप्तता त्यानें पाळलीच नाहीं.

## परदेशी कंपन्यांतील वरिष्ठ हिंदी नोकर

परदेशी मालकीच्या अगर नियंत्रणाखालीं असलेल्या कंपन्यांतून वरिष्ठ जागांवर काम करीत असलेल्या हिंदी नोकरासंबंधीची माहिती त्या कंपन्यांनीं पाठविली आहे. १९६३ अखेरची माहिती परदेशी व्यापारी व औद्योगिक संघटनांनीं सरकारला पुरविली आहे. वरिष्ठ नोकऱ्यांचें हिंदीकरण करण्याच्या बाबतींत सर्व बाजूंनीं प्रगति झाल्याचें ह्या माहितीवरून दिसून येतें. ह्या कंपन्यांतून मोठ्या जागांवर काम करणाऱ्या हिंदी नोकरांची टक्केवारी आतां ८१·५ पर्यंत वाढली आहे. त्यापूर्वीं ही टक्केवारी ७७·७ अशी होती. १ जानेवारी, १९६३ ह्या दिवशीं दरमहा १ हजार रुपयांपेक्षा अधिक पगार मिळविणाऱ्या हिंदी नोकरांची संख्या १६ हजार होती ती १ जानेवारी, १९६४ रोजीं जवळ जवळ १७ हजार झाली.

## निर्वासितांच्या पुनर्वसनाच्या योजना

पूर्व पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या निर्वासितांचें पुनर्वसन करण्यासाठी भारत सरकारनें ५८ योजना आंखलेल्या आहेत. त्यांतून २४ निर्वासित कुटुंबांची सोय करण्यांत येईल. सर्व योजनांना मिळून ८ कोटी रुपये खर्च येईल. निर्वासितांना जीवनक्रम पुन्हां सुरू करण्यासाठी सर्व प्रकारच्या सवलती देण्यांत आलेल्या आहेत. त्याशिवाय त्यांच्यासाठी उघडण्यांत आलेल्या तात्पुरत्या शिबिरांतून ६,७०० लोकांना रोजगार पुरविण्यांत आला आहे. ज्या निर्वासितांना काम करण्यासाठी शिक्षणाची जरूर असेल अशांना शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे. निर्वासितांच्या दंडकारण्य वसाहतीवर चालू आर्थिक वर्षांत ३२८ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**रशिआंतील नागरी संरक्षण योजना**—अणुबॉम्बच्या संभाव्य हल्ल्यापासून नागरिकांचें संरक्षण करण्याच्या योजनांकडे रशिआचें संरक्षणखातें अलीकडे अधिक लक्ष देऊं लागलें आहे. पश्चिम युरोपांतील देशांनीं ह्या प्रश्नाकडे जितकें लक्ष दिलें आहे, तितकें रशिआनें आजपर्यंत दिलेलें नव्हतें. दुसऱ्या महायुद्धांत रशिआनें जी नागरी संरक्षणयोजना चालू केली तीच आजहि बहुतेक जारी आहे.

**फ्रेंच स्त्रियांना अधिक हक्क**—फ्रान्सच्या सरकारनें विवाहित स्त्रियांना सध्यापेक्षा अधिक हक्क देण्यासाठीं एक कायदा करण्याचें ठरविलें आहे. कायदा मंजूर झाल्यावर फ्रेंच विवाहित स्त्रियांना ब्रिटन, अमेरिका इत्यादि देशांतील स्त्रियांचें स्थान प्राप्त होईल. फ्रान्समध्यें सध्यां प्रचलित असलेल्या कायद्याप्रमाणें विवाहित स्त्रीचा पति हा तिचा व तिच्या मालमत्तेचा सर्वंकष स्वामी असतो. हा कायदा नेपोलिअन बोनापार्टनें केलेला आहे.

**चांगल्या जातीच्या गाईबैलांची मागणी**—चीनला चांगल्या जातीच्या गाईंची व बैलांची पैदाशीसाठी अतिशय आवश्यकता आहे. अशा प्रकारचीं गुरें पाकिस्तान विमान वहातूक खातें हवाई मार्गानें त्वरित करूं शकेल काय अशी विचारणा चीनकडून करण्यांत आली आहे. वाहतूक करण्यासाठीं खास विमानें वापरण्यांत येण्याचा संभव आहे.

**कर्ज नाकारण्याचा संभव**—पश्चिम पाकिस्तानांत कॅनडाच्या मदतीनें अणुशक्तिचलित वीज केंद्र उभारण्याचें घाटत आहे. ह्या केंद्रासाठीं कॅनडाकडून ५·१ कोटी डॉलर्सचें कर्जहि मिळणार आहे. परंतु केंद्राच्या उभारणीची किंमत कमी करण्यांत यावी असा आग्रह पाकिस्तान सरकार धरीत आहे. कॅनडानें पाकिस्तानचा आग्रह न मानल्यास पाकिस्तान कर्ज नाकारण्याचा संभव आहे.

**१५ कोटींच्या तांदुळाची खरेदी**—मध्यप्रदेशाच्या छत्तीसगड भागांतून मध्यवर्ती सरकारच्या अन्नाधिकाऱ्यांनीं २ लाख,५० हजार टन तांदुळाची खरेदी केली आहे. त्याची किंमत सुमारें १५ कोटी रुपये आहे. खरेदी केलेला तांदूळ गुजरात, महाराष्ट्र, केरळ व पश्चिम बंगाल राज्यांकडे पाठविण्यांत आला आहे.

**विशेष प्रकारच्या पोलादाचें उत्पादन**—कांहीं विशेष प्रकारच्या पोलादाची भारताची गरज वाढती आहे. त्यामुळें अशा प्रकारच्या पोलादाची सध्यां मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. भारतामधील पोलाद कारखान्यांतून जरूर त्या पोलादाचें उत्पादन होऊं लागलें आहे. परंतु, गरज संपूर्णपणें भागविण्यासाठीं उत्पादनांत हळूहळू वाढ करण्यांत येणार आहे.

**हिंदी चित्रपट पहाणाऱ्यांची दंगल**—पाकिस्तानांतील ढाका येथील आंतरराष्ट्रीय चित्रपटप्रदर्शनांत 'महानगर' हा बंगाली चित्रपट दाखविण्यांत येणार आहे. चित्रपटाचीं तिकिटें मिळविण्यासाठीं हजारों सिनेरसिकांनीं चित्रपटगृहाला गराडा घातला. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या आधीं दोन दिवसच तिकिटें मिळूं शकतील असें सांगण्यांत आल्यावर रसिक खवळले व त्यांनीं तिकिट ऑफिसवर दगडविटांचा मारा केला.

**पूर्व पाकिस्तानमधील पूरनियंत्रण**—पूर्व पाकिस्तानांतील पुरांना आळा घालण्याची योजना पाकिस्ताननें मंजूर केलेली आहे. ही योजना टप्प्यानें अंमलांत आणण्यांत येणार असून तीसाठी ३५० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. पूर्व पाकिस्तानमधील पाणी व वीज ह्यांचा विकास करणाऱ्या संघटनेतर्फे ती पूर्ण करण्यांत येईल. ह्या कामांत परदेशीय तज्ज्ञांचीहि मदत घेण्यांत येणार आहे.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ३९८ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५१ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि. ची प्रगति भक्कम पायावर असल्यामुळें आणि बँकेनें मजबुतीला नेहमींच प्राधान्य दिलेलें असल्यामुळें, तिचा ताळेबंद कोणत्याहि कसास सहज उतरूं शकणारा आहे. पावणेतीन कोटी रु. पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या ह्या बँकेच्या सुमारें ४० शाखा असून तिचा नफा २ लक्ष, ३८ हजारांवर आहे आणि ती ९% डिव्हिडंड देत आहे, ह्याचें रहस्य तिच्या किफायतशीर व्यवहारामध्यें आढळेल. बँकेचें ८ लक्ष रु. चें सर्व भांडवल पूर्णपणें भरणा झालेलें असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत ६ लक्ष रु. आहेत. बँकेनें सुमारें दीड कोटी रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत, त्यांपैकी ८०% कर्जें पूर्णपणें सुरक्षित तारणावरचीं आहेत. कमिशन, एक्सचेंज व ब्रोकरेज ह्याद्वारां बँकेला गेल्या वर्षी सुमारें ३½ लक्ष रु. मिळालें; ह्या उत्पन्नासाठी खर्च त्या प्रमाणांत नसतो आणि त्यांत धोकाहि नसतो; आणि ह्या उत्पन्नावरून बँकेच्या उपयुक्ततेची चांगली कल्पना येते. बँकेची गेलीं १८ वर्षे ज्यांनीं अत्यंत कार्यक्षमतेनें, निष्ठेनें व परिश्रमपूर्व सेवा केली, ते श्री अ. रा. नाईक मॅनेजिंग डायरेक्टरच्या पदावरून १-११-६४ रोजीं निवृत्त झाले असले, तरी डायरेक्टर ह्या नात्यानें त्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस मिळत राहणार आहे. श्री. ह. सि. कुलकर्णी हे त्यांच्या जागीं चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर (जनरल मॅनेजर) म्हणून आतां काम करणार आहेत. ते मुख्य कचेरीचे मॅनेजर होतेच. बँकेच्या बोर्डातील सभासदांची कार्यपद्धति बँकेच्या सर्वांगीण वाढीस पोषक अशीच आहे.

### मंत्र्यांच्या घरचें फर्निचर, वीज फिटिंग्ज

मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांच्या घरील फर्निचरची आणि विजेच्या उपकरणांची किंमत दर्शविणारा तक्ता लोकसभेस सादर करण्यांत आला. त्याचा तपशील असा :—

| | किंमत |
|---|---|
| जी. एल. नंदा | रु. ३७,४५८ |
| टी. टी. कृष्णम्माचारी | रु. ३८,५०० |
| इंदिरा गांधी | रु. ३५,१२९ |
| स्वर्णसिंग | रु. ३३,६५० |
| यशवंतराव चव्हाण | रु. ३८,१८२ |
| संजीव रेड्डी | रु. २०,८९६ |
| सी. सुब्रह्मण्यम् | रु. ३६,२०८ |
| हुमायून कबीर | रु. ३३,९२२ |
| एम. सी. छगला | रु. ३२,९८२ |
| डी. संजीवय्या | रु. ३८,३८९ |
| महावीर त्यागी | रु. ३०,३१७ |
| ए. के. सेन | रु. ३६,९१३ |
| सत्यनारायण सिंहा | रु. ३८,६८६ |
| स. का. पाटील | रु. ७,४१० |

### साखरेच्या निर्गतीमुळें २·१ कोटी रु. नुकसान

१९६४–६५ मध्यें भारतानें साखरेची निर्गत केली, त्यामुळें १९ कोटी रु. चें परदेशीय चलन उपलब्ध झालें. परंतु त्यांत २·१ कोटी रु. चें नुकसान सोसावें लागलें. निर्गत खालील देशांकडे झाली.—

मलाया: १४,५०९ टन; दक्षिण व्हिएटनाम: १९,३४६ टन; युनायटेड किंग्डम: १०,५२५ टन, अमेरिका: १९,४३१ टन; हाँगकाँग: १०,४६९ टन; इटली: १९,१५८ टन; जपान: ६०,८६६ टन

### दि बँक ऑफ कराड लि., कराड

कराड येथील बँक ऑफ कराड लि. ची १९ वी वार्षिक सभा शुक्रवारी चेअरमन श्री. नानासाहेब बुधकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली भरून तीमध्यें अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक, भागधारकांना डिव्हिडंड देणें, हीं कामें एकमतानें मंजूर करण्यांत आलीं.

पुढील तीन वर्षांसाठी सर्वश्री एम. आर. देशपांडे व आर. ए. ऊर्फ काकासाहेब आराणके यांची संचालक मंडळावर बिनविरोध निवड झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. बँकेनें आपल्या भागधारकांना शेंकडा ६ टक्के डिव्हिडंड दिल्याचें घोषित केलें.

बँकेचे चेअरमन श्री. नानासाहेब बुधकर यांनीं बँकेच्या प्रगतीचा आढावा घेणारें भाषण केलें. बँकेचें पाऊल प्रगतीकडे पडत असल्याची तौलनिक माहिती देतांना ते म्हणाले, "बँकेचे वसूल भांडवल रु. ५,४२,०००, रिझर्व्हस् रु. २,०१,००० रु., ठेवी ८१,८३०००, निव्वळ नफा रु. ५८,००० झाला आहे. कोल्हापूरला आमच्या बँकेची शाखा लवकरच निघणार आहे. बँकेला श्री. म. वि. संढंकर व हाताखालचा सेवकवर्ग कर्तव्यतत्पर लाभला आहे."

### सहकारी सोसायट्यांत स्त्रियांचें स्थान

"स्त्रिया आणि सहकार" ह्या विषयावर चर्चासत्र २६ आणि २७ मार्च रोजीं दिल्ली येथें भरविण्यांत आलें होतें. खेडेगावापासून अखिल भारतीय स्वरूपाच्या, सर्व सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळावरील २५ % जागा स्त्रियांसाठी कायद्यानेंच राखून ठेवल्या जाव्या, असें त्यांत घोषित करण्यांत आलें. कांहीं विशेष कार्यांकरितां सोसायट्या वगळल्या, तर स्त्रियांच्याच केवळ सोसायट्या असूं नयेत, असेंहि मत दिसून आलें. सर्व सोसायट्यांत अधिकाधिक स्त्रिया सभासद म्हणून नोंदविल्या जाव्या, असेंहि चर्चेत सांगण्यांत आलें.

### मोटारींच्या किंमती वाढण्याची शक्यता

मोटारींच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. निरनिराळ्या मोटारींत वापरण्यांत येणाऱ्या परदेशी भागांच्या संख्येप्रमाणें किंमतींत कमीअधिक वाढ होईल. टायर्सच्या किंमती वाढल्यानें मोटार कारखानदारांनीं मोटारींच्या किंमती वाढविण्याची परवानगी सरकारकडे मागितली होती. टायर्सच्या वाढलेल्या किंमती लक्षांत घेऊन गाड्यांच्या किंमती वाढण्याचें आणखी एक कारण म्हणजे सरकारनें बसविलेला कर. ह्या करामुळें उत्पादनाचा खर्च वाढल्यास त्या प्रमाणांत गाड्यांच्या किंमती वाढविण्याची परवानगीहि सरकारकडून मिळण्याचा संभव आहे. मात्र अजून ह्या बाबीबद्दल विचार चालू आहे.

### हिंदी चित्रपटाचे पाकिस्तानी रसिक

ढाका येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत अखेरच्या दिवशीं 'महानगर' हा सत्यजित रे ह्यांनीं दिग्दर्शित केलेला बोलपट दाखविण्यांत येणार होता. चित्रपटाची तिकिटें मिळविण्यासाठी ५० हजार पाकिस्तानी रसिक सकाळपासून रांगा लावून उभे होते. त्यांपैकी कांहीं जणांनीं दंगामस्ती केल्यामुळें पोलिसांना लाठीमार करावा लागला. ह्या रसिकांत हजारों तरुणीहि होत्या. त्यांनीं चित्रपटगृहासमोर जोराचीं निदर्शनें केलीं. अखेर, चित्रगृहाच्या चालकांनीं स्त्रियांसाठी एक खास खेळ दाखविण्याचें मान्य केलें. ह्या चित्रपटाचे मुळांत फक्त तीन खेळ दाखविण्यांत येणार होते. पण लोकांची मागणी लक्षांत घेऊन ११ खेळ दाखविण्याचें ठरलें. पाकिस्तानांत हिंदी चित्रपट आयात करण्यास बंदी आहे.

## विवाहविषयक जाहिराती

### समाजसत्तावादी देशांतील परिस्थिति; आर्थिक स्वातंत्र्याचे परिणाम

चेकोस्लोव्हाकिआंत पंधरा वर्षांवरील युवकांची संख्या १२ लाख आहे, तर युवतींची संख्या ११ लाख आहे. साराश तरुणांच्या मानानें तरुणी कमी आहेत. पण मध्यमवयीन स्त्री-पुरुषांच्या शिरगणतींत मात्र नेमकें उलट चित्र दिसून येतें. चेकोस्लोव्हाकिआंत १ लाख, ७० हजार विधुर आहेत, तर ७ लाख, ९० हजार विधवा आहेत. दुसऱ्या महायुद्धांत झालेल्या भयंकर प्राणहानीमुळें ही अनावस्था निर्माण झाली, हें स्पष्ट आहे. घटस्फोट घेऊं इच्छिणाऱ्यांत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे. आज चेकोस्लोव्हाकिआंत घटस्फोट घेतलेले पुरुष ८० हजार आहेत, तर स्त्रिया १ लाख, २० हजार आहेत. एकूण १ कोटी, ४० लाख वस्तीच्या या छोट्या देशांत पुरुषांच्या एकूण संख्येपेक्षा स्त्रियांची एकूण संख्या एक लाख, ३० हजारांनीं जास्त आहे.

ज्याअर्थी युवकांची संख्या युवतींपेक्षा एक लाखानें कमी आहे, त्याअर्थी वयस्क विधवांशींच अथवा घटस्फुटितेशींच लग्न करण्याखेरीज कित्येकांना गत्यंतर दिसत नाहीं. एक घटस्फोट घेतलेली अनुभवी स्त्री, पुनश्च 'लग्नाची बेडी' अडकवितांना साहजिकच जादा चोखंदळ बनलेली असते. तिथें स्त्रीला एकटें राहणें परवडतें. कारण, प्रत्येक स्त्री कोणत्या ना कोणत्या व्यवसायांत गुंतलेली असते. आर्थिकदृष्ट्या ती स्वतंत्र आणि स्वावलंबी असल्यानें जीवनसाथी निवडण्यांत ती चोखंदळ असणें स्वाभाविक आहे.

लग्न करून सुखानें संसार करूं इच्छिणाऱ्या सौभाग्यकांक्षिणी, विधवा आणि घटस्फुटिता यांच्यापुढील प्रश्न जसा बिकट आहे, तसाच योग्य पत्नी मिळवूं इच्छिणाऱ्या पुरुषांपुढील प्रश्नहि तितकाच बिकट आहे. शेवटीं, मानसशास्त्रज्ञांशीं चर्चा केल्यावर 'वधू पाहिजे' आणि 'वर पाहिजे' या जाहिराती मातब्बर राष्ट्रीय दैनिकांतून देण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे.

पैसे दिले कीं वाटेल ती जाहिरात छापली जाते, अशी परिस्थिति चेकोस्लोव्हाकिआंत नाहीं. समाजसत्तावादी देशांत पैशाच्या जोरावर जाहिराती छापून भोळ्या-बापड्यांना फसविणें शक्य नसतें. सामाजिक गरज लक्षांत घेऊनच जाहिरात प्रसिद्ध केली जाते. विवाह-विषयक 'पाहिजे' च्या पांच हजार जाहिराती १९६४ च्या पाहिल्या सहामाहींत वर्तमानपत्रांकडे आल्या, पण त्यांतल्या फक्त दोन हजार जाहिराती प्रसिद्ध झाल्या.

त्या प्रसिद्ध करतांना, महत्त्वाप्रमाणें अग्रहक्क देण्यांत आला. मुलें-बाळें असलेल्यांनीं लग्न करण्याची इच्छा दर्शविली असेल तर त्यांना प्रथम अग्रक्रम दिला गेला. कित्येक जाहिराती तर सामुदायिक शेतांतर्फे देण्यांत आलेल्या होत्या. जो कोणी पुरुष किंवा स्त्री, सामुदायिक शेतावरील स्त्रीशीं किंवा पुरुषाशीं विवाह करील त्याला राहायला घर देण्याची तयारी संचालकांनीं दाखवली होती.

या जाहिरातींवरून दिसून आलें कीं, शेतांवर राबणाऱ्या कित्येक पुरुषांपाशीं मोटार आहे, टेलिव्हिजन आहे, सुसज्ज घर आहे, पण घरधनीण नाहीं.

अशा जाहिराती देणारांपैकी १५ टक्के लोक २५ वर्षांखालील होते; १७ ते १८ टक्क्यांचें वय २५ ते ३० होतें; ३६ ते ३८ टक्क्यांचें वय ४१ ते ६० होतें आणि ६ ते ८ टक्क्यांचें वय ६० होतें. यावरून ६० टक्के स्त्री-पुरुष ३१ ते ६० वर्षांचे होते.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी चेकोस्लोव्हाक स्त्री लग्नाला खूप उत्सुक असे. पण समाजसत्तावाद आल्यावर तिला समानता लाभली, बेकारीचें भय लवमात्र नाहीं, उच्च शिक्षण मिळतें आणि सर्व क्षेत्रें तिला उपलब्ध असतात.

लग्नानंतरहि चेकोस्लोव्ह स्त्रीला नोकरी करणें आवडतें. कांहीं स्त्रियांनीं 'फक्त पुरुष-मित्र' पाहिजे अशा जाहिराती दिल्या होत्या. म्हणजे त्यांना लग्न करायचें नव्हतें, हें स्पष्ट आहे.

विवाहविषयक जाहिरातींत आतां शैक्षणिक योग्यता वगैरेवर भर दिला जातो. योग्य, बुद्धिमान्, सन्माननीय, विश्वसनीय, सुंदर भावनाशील अशा विशेषणांची हल्लीं खैरात असते. 'धूम्रपान न करणारा' ना प्रथम पसंती, असेंहि उल्लेख आढळतात. मुलेंबाळें असलेल्या स्त्रीशीं लग्न करायला बरेच लोक तयार असतात. पांच मुलें असलेल्या एका खाणकामगार स्त्रीच्या जाहिरातीला २० उत्तरें आलीं. चार मुलें असलेल्या घटस्फुटितेलाहि २० हून अधिक पत्रें आलीं. कुमारी माता किंवा पुत्रवत्सल स्त्रीशींच लग्न करायला उत्सुक असेहि पुरुष चेकोस्लोव्हाकिआंत आहेत.

### आहारांत धान्याचें प्रमाण सर्वांत अधिक

हिंदमधील निरनिराळ्या भागांतील लोकांच्या आहाराविषयीं इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चनें गेलीं कांहीं वर्षे पहाणी चालविली होती. भारताच्या विविध विभागांतील लोकांच्या आहाराच्या संबंधीविषयीं ह्या पहाणींत तपशीलवार माहिती जमविण्यांत आली आहे. ह्या माहितीवरून असें दिसून आलें आहे कीं भारतामधील लोकांच्या आहारांतील प्रमुख भाग धान्यांच्या पदार्थांनीं व्यापलेला आहे. लोकांच्या उत्पन्नापैकी ६० ते ६८ टक्के उत्पन्न त्यांना खाद्यपदार्थांसाठी खर्च करावें लागतें. दूध व दुधापासून बनविलेले पदार्थ, खाद्य तेलें, फळें, मांस, इत्यादि प्रकारचें अन्न लोकांच्या खाण्यांत फार अल्प प्रमाणांत येतें. समाजांतील कांहीं थरांत तर ह्या गोष्टींचा संपूर्ण अभावच दिसून येतो. शहरांतील सर्वसामान्य नागरिक आपल्या उत्पन्नापैकी २५ टक्के उत्पन्न धान्यासाठी, ९ टक्के दूध व दुधाच्या पदार्थांसाठी आणि २६ टक्के इतर प्रकारच्या अन्नपदार्थांसाठी खर्च करतो. उलट, ग्रामीण भागांतील सामान्य माणूस ४१ टक्के खर्च धान्यावर करतो, ८ टक्के दूध व दुधाच्या पदार्थांवर आणि फक्त १९ टक्के इतर अन्नपदार्थांवर खर्च करतो. पंजाब, हिमाचलप्रदेश, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतील लोक ३ हजार कॅलरींपेक्षा अधिक उष्णता उत्पन्न करणारा आहार घेतात. इतर राज्यांतील आहार २ हजार ते २॥ हजार कॅलरीज उष्णता निर्माण करणारा असतो. सगळ्यांत कमी उष्णता उत्पन्न करणारा म्हणजे १,८०० कॅलरीपर्यंतचा आहार केरळ राज्यांत दिसून येतो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोक मांसाहारी आहेत. गुजरात, पंजाब व राजस्तान ह्या राज्यांतून मांसाहारी लोकांची संख्या ४० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

### १० पैशांना उपलब्ध होणारें संततिप्रतिबंधक साधन

IUCD ह्या नांवाच्या प्लॅस्टिकच्या संततिप्रतिबंधक साधनास मध्यवर्ती आरोग्य खात्यानें मान्यता दिली आहे. त्याची किंमत १० पैसे राहील. गर्भाशयांत तें बसविल्यानंतर तें काढण्याची केव्हांहि जरुरी राहणार नाहीं. ८०० स्त्रियांवर त्याचा प्रयोग केला, तो समाधानकारक ठरला आहे. १० लक्ष साधनांची ऑर्डर मध्यवर्ती सरकारनें उत्तर प्रदेश सरकारच्या प्लॅस्टिक फॅक्टरीकडे नोंदविली आहे.

## ठेवीवरील व्याजाच्या वाढत्या दरांचे परिणाम

### महाराष्ट्र बँकेचे चेअरमन श्री. वा. पु. वर्दे ह्यांचें वार्षिक सभेतील भाषण

या वर्षी भारतीय बँक व्यवसायास बऱ्याच प्रश्नांस तोंड द्यावें लागलें. ठेवीवरील व्याजाचे दर व कर्मचारीवर्गाचा असंतोष हे दोन प्रश्न त्यांत विशेषेकरून प्रमुख होते. बँकांकडील ठेवींवरील व्याजाच्या दरांत या वर्षी तीन वेळां बदल झाला. ऑगस्टमध्यें बँकांनीं स्वेच्छेनें या दरांत कांहीं किरकोळ बदल केला. दुसरा बदल ऑक्टोबरमध्यें रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार झाला, आणि शेवटचा बदलहि अहवालानंतर फेब्रुवारीमध्यें रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार झाला. आतां बचत ठेवींवरील दर ४ टक्के असून मुदत ठेवींवरील दर मुदतीप्रमाणें ७॥ टक्क्यांपर्यंत आहे. स्वाभाविकच, बँका देत असलेल्या कर्जावरील व्याजाचा दरहि १॥ टक्क्यानें वाढला. बँक-रेटमध्यें सप्टेंबरमध्यें एकदा व फेब्रुवारींत एकदा अशी दोनदा वाढ करण्यांत आली. परिणामी बँक-रेटमध्यें एकूण दीड टक्का वाढ होऊन तो सध्यां ६ टक्के आहे. बँकरेटमधील पहिल्या बदलाच्या सुमारास रिझर्व्ह बँकेनें बँकांच्या तरतेपणाबद्दलच्या व्याख्येंत बदल केला. आतां बँकांच्या सर्चांत वाढ झाली असून साहजिकच कर्जावरील व्याजाच्या दरांतहि वाढ झाली आहे. अर्थात् त्याबाबत कर्जदारांची थोडी नाखुषीच व्यक्त होत आहे.

बँकरेट व इतर व्याजांच्या दरांत अगदीं थोड्या कालावधींत दोन वेळां वाढ झाल्यानें, पैसा गुंतविणें आणखी थोडें लांबणीवर टाकलें तर याहिपेक्षा जास्त व्याज मिळेल अशी अपेक्षा निर्माण झालेली दिसते. या अपेक्षेमुळें ठेवींवरील व्याजांत वाढ झाली असतांहि ठेवींत त्या प्रमाणांत वाढ होत नाहीं व जी होत आहे ती बचतखात्यांत व किंवा अल्पमुदतीच्या ठेवींतच होत आहे. गेल्या ऑक्टोबरांत रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार ठेवींवरील व्याजाचे दर वाढविण्यांत आले, तेव्हांपासून परत फेब्रुवारींत दर वाढवीपर्यंत याचा पडताळा आला आहेच.

त्याचप्रमाणें कर्जावरील व्याजाच्या दरांतील वाढीनें कर्जमागणीस अजिबात आळा बसलेला नाहीं. कारण विकसनशील अर्थव्यवस्थेंत कर्जमागणी अमर्याद असते व ती व्याजाच्या दरावर विशेष अवलंबून नसते. व्याजाचे दर आतां खूपच वर गेले आहेत. बँका परस्परांना देत असलेल्या तात्पुरत्या कर्जावरील व्याजाचा दरहि गेले कित्येक दिवस आठ टक्क्यांचेवर आहे. यावरून कर्जमागणी कमी झालेली नाहीं, हें दिसून येईल.

या वर्षीतील बँक व्यवसायाची दुसरी समस्या म्हणजे वर्षाच्या मध्याच्या सुमारास बँक कर्मचाऱ्यांनी महिना दीड महिना चालविलेली चळवळ. बँक कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या देसाई निवाड्याची मुदत सरकारनें एक वर्ष वाढविल्यानें ही चळवळ झाली. या चळवळीनें बँक व्यवहारांत बरीच दिरंगाई व गैरसोय झाली. पण लौकरच या बाबतची परिस्थिति निवळली. चालू निवाड्याची मुदत संपण्यापूर्वी शक्य तितक्या त्वरेनें सरकारनें बँक कर्मचाऱ्यांसाठी नवें वेतनमंडळ नेमणें किंवा त्रिपक्ष परिषदेंत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करणें हे सर्वांच्या हिताचें आहे.

या वर्षी सर्वसाधारण आर्थिक चित्र विशेष उत्साहवर्धक नसतांनासुद्धां बँकांनीं आपली प्रगति पूर्वीप्रमाणेंच कायम ठेवण्यांत यश मिळविलें. शेड्यूल्ड बँकांकडील एकूण ठेवी १९६४ अखेर २५३७ कोटी रुपयांच्यावर गेल्या. वर्षअखेरच्या २२४६ कोटी रु. च्या ठेवींशी तुलना करतां ही वाढ १२ टक्के आहे. मागील सालीं १९६२ पेक्षा ठेवींत १२॥ टक्के वाढ झाली होती. बँकांकडे कर्जासाठी मागणीहि मोठ्या प्रमाणावर राहिली व एकूण दिलेलीं कर्जें १९४५ कोटी रुपयांपर्यंत गेलीं. गत वर्षीच्या तुलनेंत ही वाढ १४ टक्के आहे.

बँकांकडील ठेवींची वाढ होण्यास चलनपुरवठ्यांत झालेली वाढ सर्वस्वी जबाबदार होती असें म्हणतां येत नाहीं. एकूण चलन पुरवठा या वर्षी १० टक्क्यांनीं वाढला. त्यांपैकीं रोख चलन-केवळ ७ टक्क्यांनीं वाढलें. तर एकूण ठेवी १६ टक्क्यांनीं वाढल्या. बचतीची संचय हळूहळू वाढत आहे हेंच या आंकडेवारीवरून दिसतें. आपल्या ताळेबंदावरूनहि ही गोष्ट दिसून येईल. आपल्याकडील बचत ठेवींत यंदा २४ टक्क्यांनीं वाढ झाली आहे.

पत नियंत्रणाचे निरनिराळे उपाय योजिले जात असतां व बँकांच्या तरतेपणाची नवीन व्याख्या अमलांत आली असतांहि बँकांनीं दिलेल्या कर्जांत १४ टक्क्यांनीं वाढ झाली हें विशेष होय. या कर्जांमध्येंहि औद्योगिक कर्जांचें प्रमाण वाढत आहे. आपली स्थिति बरीच तरती असल्यानें आपणांस कर्जाचें प्रमाण वाढविण्यास बराच वाव होता. त्यामुळें वर्षअखेरीस आपल्या कर्जांत ३४ टक्क्यांनीं वाढ झाली. बँकांच्या प्रगतींतील तें सातत्य एकंदर आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकच उठून दिसतें.

या वर्षी या व्यवसायांत बऱ्याच दूरगामी बदलास तोंड द्यावें लागलें. ठेवींवरील व्याजांत आतां बरीच वाढ झाली आहे. त्यामुळें बँकांच्या सर्चांत आतां बरीच वाढ होईल. तरतेपणाच्या नव्या व्याख्येमुळें रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या कर्जांची महर्गताहि वाढली आहे. तरीदेखील सोळा प्रमुख बँकांचा १९६४ मधील नफा १०·४१ कोटी रुपयांवरून या वर्षी ११·५६ कोटी रुपयांवर गेला आहे. ही वाढ सुमारें ११ टक्के आहे. नफ्याची ही वाढ बँक व्यवसायाच्या अंगभूत सामर्थ्याची द्योतक आहे.

---

## दूरचित्रवाणीच्या यंत्राची निर्मिति

पिलानी येथील मध्यवर्ती इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग संशोधन संस्थेंत दूरचित्रवाणीचे सेट्स् तयार करण्यांत येत आहेत. प्रत्येक सेटची किंमत सुमारें ८०० रुपयेपर्यंत राहील. त्यापैकीं १५० रुपयांचे सुटे भाग परदेशी बनावटीचे असतील. सध्यां तरी ह्या माध्यमाचा उपयोग शिक्षणासाठी करण्यांत येणार आहे; मनोरंजनासाठी नाहीं, असें माहिती आणि नभोवाणी खात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनीं सांगितलें आहे. विद्यापीठें आणि कॉलेजें ह्यांच्याकडून दूरदर्शनाच्या सेटससाठीं फार मोठी मागणी करण्यांत येत आहे. त्याशिवाय कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्याच्या कामींहि त्यांचा चांगला उपयोग होईल. पिलानी येथें दरसाल १००० सेटस तयार करण्यांत येणार आहेत. त्या मानानें मागणी मात्र बरीच मोठी म्हणजे १६ ते २० हजार सेटसची आहे.

---

## केसांच्या निर्यातीमुळें परदेशीय चलनाची प्राप्ति

कांहीं दिवसांपूर्वी मद्रासमधील चार व्यापारी कंपन्यांनीं माणसांच्या केसांची परदेशांना निर्यात करून २५ हजार रुपयांचें परदेशीय चलन मिळविलें. अमेरिका, जपान, पश्चिम जर्मनी व इतर कांहीं देश ह्यांनीं हा माल घेतला. केसांची निर्यात करून भारताला दरसाल २५ लाख रुपयांच्या परदेशीय हुंडणावळीची प्राप्ति होते. मद्रास शहरांत ह्या वस्तूचा व्यापार करणाऱ्या १०–१२ कंपन्या आहेत. तिरुपती आणि पालनी हीं दक्षिण भारतामधील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रें आहेत. ह्या ठिकाणीं दरसाल लाखों भाविक लोक यात्रा करण्यासाठी जातात आणि धार्मिक विधि म्हणून मुंडण करतात. मद्रासमधील कंपन्यांना ह्या क्षेत्रापासूनच मुख्यतः केसांचा पुरवठा होतो.

## प्रगतीचीं दोन चक्रें...




## शेती व उद्योगधंदे

उद्योगधंद्याचीं चक्रें अव्याहत फिरतीं ठेवण्यासाठीं पाण्यांचा सतत पुरवठा पाहिजे असतो, रसायनें आणि द्रवपदार्थ इकडून तिकडे न्यावे लागतात, मलिन पदार्थांचा निचरा करावा लागतो. हीं कामें पंपांच्या सहाय्यानें होतात. कारखान्यांत आणि शेतीसाठीं पदोपदीं पंपांची गरज असते. ही गरज **किर्लोस्कर पंप** उत्तम प्रकारें भागवीत आहेत.

**किर्लोस्कर**

पंपनिर्मितींत अग्रेसर



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी – जिल्हा सांगली.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★


हे पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.